पुढारी

# विद्यापीठात आज ऑनलाईन परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या जनसंपर्क कक्षाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने सर्वसामान्य घटकांसह विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती घडविण्यासाठी दृष्टीने शुक्रवारी (दि. २८) सकाळी ११ वाजता विशेष ऑनलाईन परिसंवादाचे आयोजन केले आहे. परिसंवादामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन हे सहभागी होणार आहेत.

लोकमत





नारायण कुलकर्णी वर्जेश सोळंकी

# कुलकर्णी, सोळंकी यांना काळसेकर पुरस्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा २०२३ चा सतीश काळसेकर काव्य पुरस्कार कवी नारायण कुलकर्णी-कवठेकर यांना व कवी ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार कवी वर्जेश सोळंकी (मुंबई) यांना जाहीर केला.

मराठीतील ज्येष्ठ कवी, लेखक आणि ग्रंथप्रेमी सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ काळसेकर कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठाकडे दिलेल्या देणगीतून प्रतिवर्षी हे पुरस्कार देण्यात येतात. सतीश काळसेकर काव्य पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह व २१ हजार रुपये, असे आहे. कवी ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह व १० हजार रुपये, असे आहे.

तरुण भारत

# एमपीएससी परीक्षेत विद्यापीठच्या विद्यार्थ्यांचे यश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील





रोहित नलवडे शिवानंद कांबळे

इंडिस्ट्रीयल केमिस्ट्रीचा विद्यार्थी शिवानंद कांबळे, व सेंद्रीय रसायनशास्त्रचा विद्यार्थी रोहित नलवडे यांची असिस्टंट केमिकल ॲनालायझर, राजपत्रित अधिकारी (वर्ग –२) पदी निवड झालेली आहे.

नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ध्येय गाठण्यासाठी जिद्द आणि चिकाटी असेल तर यशाला गवसणी घालणे शक्य असल्याची प्रचिती यांच्या निवडीमुळे येते. ते लवकरच महाराष्ट्रातील फॉरेन्सिक लॅबमध्ये रुजू होणार आहेत. त्यांना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, रसायनशास्त्राचे विभागप्रमुख डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. के. एम. गरडकर व विभागातील सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

तरूण भारत

# एमबीएच्या विद्यार्थ्यांची आयटी कंपन्यांमध्ये निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एमबीए अभ्यासक्रमांच्या ३७ विद्यार्थ्यांची विविध आयटी कंपन्यात निवड झाली आहे. टाटा स्ट्राइव्ह आणि गुगल यांच्या संयुक्त विद्यमाने डाटा ऍनालोटिक्स, आय टी सपोर्ट, यु.एक्स. डिझाईन, आयटी ऑटोमेशन, डिजिटल मार्केटिंग हे कौशल्यावर आधारित प्रमाणपत्र ऑनलाईन अभ्यासक्रम विद्यापीठातील सेंट्रल ट्रेनिंग आणि प्लेसमेंट सेल यांनी सुरु केलेले होते. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची निवड केली आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास रोजगाराच्या संधी मिळतात, अशी माहिती दूरशिक्षणचे संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या आजच्या परीक्षाही स्थगित

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोल्हापूरसह सांगली, सातारा जिल्ह्यांमध्ये सध्या जोरदार पाऊस सुरू आहे. यामुळे काही रस्ते बंद झाले आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात आज, शुक्रवारी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आल्याने शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील आज होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांमध्ये सध्या उन्हाळी सत्र परीक्षा सुरू आहेत. गेल्या चार दिवसांपासून या जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस सुरू असल्याने नद्यांचे पाणी पात्राबाहेर पडले आहे. परिणामी, अनेक नद्यांवरील पूल पाण्याखाली गेल्याने रस्ते बंद झाले आहेत. शिवाय हवामान विभागाने या जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचा इशाराही दिला आहे.

यामुळे विद्यापीठाने बुधवार व गुरुवारच्या परीक्षा स्थगित केल्या होत्या. आजही या जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीची शक्यता वर्तविल्याने आज, शुक्रवारी होणाऱ्या परीक्षा स्थगित केल्या आहेत.

सोमवारपासून पुन्हा वेळापत्रकानुसार परीक्षा होणार आहेत. स्थगित केलेल्या परीक्षांचे नवीन वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

महासत्ता

# वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी ओंकार कुंभारची निवड

इचलकरंजी, ता.२६-

....................

येथील देशभक्त बाबासाहेब भाऊसाहेब खंजिरे शिक्षण संस्थेच्या नाईट कॉलेजमधील बी. कॉम. भाग दोन चा विद्यार्थी ओमकार सदानंद कुंभार याची २८ जुलै ते ८ ऑगस्ट दरम्यान चेनगुडू (चीन) येथे होणाऱ्या वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झालेली आहे. या स्पर्धेत ओमकार हा ८०० मीटर धावणे या खेळ प्रकारासाठी भारतीय विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करेल.



नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये ओमकार याने शिवाजी विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करत ब्रॉंझ पदक प्राप्त केले होते. तर खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स स्पर्धेमध्ये आपल्या कामगिरीत सातत्य राखत रौप्य पदक प्राप्त केलेले आहे. धवल यश मिळवीत आंतरराष्ट्रीय स्तरावर नाईट कॉलेज व शिवाजी विद्यापीठाची विजयी पताका नेल्याबद्दल संस्थेचे संचालक व इचलकरंजी इंडस्ट्रीयल इस्टेटचे चेअरमन राहुल खंजिरे यांच्या हस्ते ओमकार कुंभार याचा रोख रक्कम व बुके देऊन गौरव करण्यात आला. त्याचबरोबर संस्थेचे चेअरमन अरुणराव खंजिरे, उपाध्यक्ष बी. एस. मुरदंडे, सेक्रेटरी शेखर पाटील, प्राचार्य डॉ. पी. डी. नारे यांनीही ओमकार याचे अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या.

पुढारी

# नवीन शैक्षणिक धोरण उपयुक्त : डॉ. चौगले

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे, असे प्रतिपादन डॉ. टी. एम. चौगले यांनी केले. शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा कार्य नियोजन बैठक विवेकानंद कॉलेजमधील ग्रंथालय हॉलमध्ये झाली. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. बैठकीत डॉ. चौगले यांनी जी-२०, वाय-२०, डब्ल्यू-२० यांविषयी उपस्थित कार्यक्रम अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. चालू शैक्षणिक वर्षामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या वर्षभरासाठीचे नियमित व विशेष श्रमसंस्कार शिबिराविषयी माहिती दिली.

प्रास्ताविक जिल्ह्याचे समन्वयक डॉ. संजय पाटील यांनी केले. संयोजक प्रा. संदीप पाटील यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. राजश्री पाटील, डॉ. अस्मिता तपासे यांनी केले. यावेळी प्रा. आदिनाथ कांबळे, प्रा. पी. आर. बागडे, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. एस. डी. शिंदे आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठाच्या आजच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. काही रस्ते बंद असल्याने कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये, यासाठी शुक्रवार (दि.२८) रोजी होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. स्थगित परीक्षेचे नवीन वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर लवकरच जाहीर करण्यांत येणार आहे. महाविद्यालय, मान्यताप्राप्त संस्था, अधिविभागातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी व इतर सर्व संबंधितांच्या याची नोंद घ्यावी. हे परिपत्रक विद्यापीठाच्या www. unishivaji. ac. in Exam Section Circulars या ठिकाणी उपलब्ध असल्याची माहिती परीक्षा विभागाच्या वतीने देण्यात आली.

पुढारी

# एम.फिल.,पीएच.डी. कोर्सवर्कची २८ ऑगस्ट रोजी परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२३ या सत्रातील एम.फिल., पीएच.डी. कोर्सवर्कची सुधारित परीक्षा २८ ऑगस्ट रोजी घेण्यात येणार आहे. विद्यापीठाने याबाबतचे परिपत्रक गुरुवारी काढले आहे. यापूर्वीच्या आदेशानुसार एम.फिल., पीएच.डी. कोर्सवर्क परीक्षा ७ ऑगस्ट रोजी सुरू होणार होती. परंतु काही कारणास्तव या तारखेत बदल करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी

# ५८९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सुरू असलेल्या उन्हाळी सत्र पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेंतर्गत आजअखेर सुमारे ५८९ परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षा सध्या सुरू आहेत. गुरुवारी मास्टर ऑफ जर्नालिझम, इनऑर्गेनिक केमिस्ट्री, समाजशास्त्र आदी सहा अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणे परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालकांनी केले आहे.

पुढारी

# नियतकालिक स्पर्धेत 'विवेकानंद' द्वितीय

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव आणि प्रोत्साहित करण्यासाठी आयोजित नियतकालिक स्पर्धेत विवेवकानंद कॉलेजने बिगर व्यावसायिक गटात द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. विद्यापीठातर्फे दरवर्षी संलग्न महाविद्यालयांसाठी उत्कृष्ट वार्षिक नियतकालिक स्पर्धा घेतली जाते. या नियतकालिकातून महाविद्यालयीन विद्यार्थी विविध साहित्य प्रकारात लेखन व कलेला अभिव्यक्त करत असतात. या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले.

पुण्यनगरी

# विद्यापीठाची परीक्षा पुन्हा स्थगित

## आजचे पेपर पुढे ढकलले

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूरसह सांगली, सातारा या जिल्ह्यांना हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्याचबरोबर अनेक रस्तेही बंद आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने शुक्रवारी होणाऱ्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवार आणि गुरुवार या दोन दिवसांच्या परीक्षाही स्थगित करण्यात आल्या होत्या. या सर्व परीक्षांचे नवीन वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

यापूर्वी विद्यापीठाने अतिवृष्टीमुळे १३ जुलैच्या परीक्षा स्थगित केल्या होत्या, तर बुधवार आणि गुरुवारी बी.टेक, बी.फार्मसी., एमबीए आणि एमसीए या चार अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या. शुक्रवारपासून परीक्षा पूर्ववत सुरू होतील, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनातर्फे देण्यात आली होती; मात्र शुक्रवारीही हवामान खात्यातर्फे अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला. त्याच बरोबर नद्यांची पाणीपातळी वाढल्याने अनेक रस्ते बंद झाले आहेत. त्यामुळे कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

अतिवृष्टीमुळे विद्यापीठ परिक्षेत्रातील तिन्ही जिल्हे प्रभावित झाले आहेत. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी बुधवार आणि गुरुवारच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. अतिवृष्टीचा इशारा कायम असल्याने शुक्रवारच्या परीक्षाही स्थगित करण्यात आल्या.

-डॉ. अजितसिंह जाधव,
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

पुण्यनगरी

# हिवाळी सत्रातील परीक्षा २० ऑक्टोबरपासून

## पदवी-पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा समावेश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षांना २० ऑक्टोबरपासून प्रारंभ होणार आहे. यामध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ५५८ परीक्षांचा समावेश आहे. या परीक्षांचे वेळापत्रक शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केले आहे.

मार्च ते एप्रिल या सत्रातील उन्हाळी परीक्षा सध्या विद्यापीठात सुरू आहेत. याअंतर्गत ५८३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा होऊन त्यांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. सध्या पूरस्थिती गंभीर असल्याने विद्यापीठाने दोन दिवस परीक्षा स्थगित केल्या आहेत. यामध्ये २६ आणि २७ जुलै या तारखांना होणाऱ्या परीक्षा स्थगित केल्या असून, शुक्रवारी (दि. २८) होणाऱ्या परीक्षाही स्थगित करण्यात आल्या आहेत. याबाबतचे नवे वेळापत्रक लवकरच जाहीर होईल. उन्हाळी सत्रातील शेवटची परीक्षा ९ ऑक्टोबर रोजी संपणार आहे. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा २० ऑक्टोबरपासून सुरू होतील, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी स्पष्ट केले आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबरमधील पदवी पारंपरिक अभ्यासक्रमाच्या प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या परीक्षांच्या तारखा लवकरच जाहीर केल्या जाणार आहेत. या परीक्षांचे अर्ज भरण्याची तारीख आणि शुल्कदेखील लवकरच विद्यार्थ्यांना सांगण्यात येईल, असेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

सकाळ

# विद्यापीठाचा वार्षिक अहवाल विधानसभेत वेळेत सादर

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा वार्षिक अहवाल विधानसभा आणि विधान परिषदेत वेळेत सादर झाला आहे. चार सदस्यांचा समावेश असलेली अहवाल दुरुस्ती समिती आणि विद्यापीठाच्या सेमिनार विभागाचे त्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे.

गेल्या वर्षीचा (१ जुलै २०२१ ते ३० जून २०२२) ५९ वा वार्षिक अहवाल मे महिन्यात झालेल्या विशेष अधिसभेत मान्यतेसाठी सादर केला. त्यामध्ये अधिसभा सदस्य अभिषेक मिठारी यांनी या अहवालातील मुद्रितशोधन, उपसमिती अध्यक्षांच्या मनोगतामधील चुका आणि काही अधिविभाग, अभ्यास केंद्रांची माहिती नसल्याचे सभागृहात मांडले. त्याची दखल घेऊन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी या अहवाल दुरुस्तीसाठी समिती गठीत केली. त्यामध्ये डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. नीलेश बनसोडे, अधिसभा सदस्य प्रा. रघुनाथ ढमकले, अभिषेक मिठारी यांचा समावेश होता. समितीने या चुका दुरुस्तीसह अद्ययावत माहितीसह संबंधित वार्षिक अहवाल विधानसभा, विधान परिषदेत १८ जुलैला सादर केला. सध्या या समिती आणि सेमिनार विभागाचे ६० वा वार्षिक अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे.

सकाळ

# शैक्षणिक धोरणावर आज ऑनलाईन परिसंवाद

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठातर्फे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह साजरा करण्यात येत आहे. याअंतर्गत जनसंपर्क कक्षाने शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने सर्वसामान्य घटकांसह विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती घडवून आणण्याच्या दृष्टीने उद्या, शुक्रवारी सकाळी ११ वाजता विशेष ऑनलाईन परिसंवाद होणार आहे.

या परिसंवादामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन सहभागी झाले आहेत. शैक्षणिक धोरणाचे बारकावे समजावून देण्याचा विद्यापीठाचा एक महत्त्वाचा उपक्रम आहे.

28 JUL 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे निर्णय

# शिवाजी विद्यापीठाच्या आजच्या परीक्षा स्थगित

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २७ : कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे शिवाजी विद्यापीठाने उद्या, शुक्रवारी होणाऱ्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. शनिवार, रविवारची सुटी असल्याने सोमवारपासून या परीक्षा पूर्ववत सुरू होण्याची शक्यता आहे.

भारतीय हवामान खात्याने विद्यापीठ परिक्षेत्रातील या तिन्ही जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे विद्यापीठाने बुधवार आणि गुरुवारच्या परीक्षा स्थगित केल्या होत्या. त्यामध्ये आणखी एका दिवसाची वाढ केली आहे. त्यानुसार शुक्रवारी होणाऱ्या बी. टेक., बी. फार्मसी., एमबीए., एमसीए या अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित केल्या आहेत. त्यासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ३४०० इतकी आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने आज एम. जे., एम. ए. सोशालॉजी., इनऑरगॅनिक केमिस्ट्री अभ्यासक्रमांच्या सहा परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत. मार्च-एप्रिल सत्रातील एम. फिल., प्री पीएचडी कोर्सवर्क अभ्यासक्रमाच्या परीक्षा पूर्वनियोजनानुसार ७ ऑगस्टपासून सुरू होणार होत्या. त्यामध्ये आता बदल केला आहे. या परीक्षा आता २८ ऑगस्टपासून सुरू होतील, अशी माहिती परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

**या अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित**

- बी. टेक.
- बी. फार्मसी.
- एमबीए.
- एमसीए



तरुण भारत

# विद्यापीठातर्फे आजच्या परीक्षा स्थगित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ संलग्न तिन्ही क्षेत्रातील अनेक गावांमध्ये पूर येण्याची शक्यता आहे. एकूण पावसाचे वातावरण पाहता शिवाजी विद्यापीठातर्फे शुक्रवारी (दि. २८) होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा रद्द केल्या आहेत. या परीक्षेची तारीख यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल. तरी महाविद्यालये, विद्यार्थ्यांनी याची दखल घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

तरुण भारत

# ऑक्टोबर-नोव्हेंबर विद्यापीठ परीक्षांच्या तारखा जाहीर

कोल्हापूर : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केले आहे. पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षांना २० ऑक्टोबरपासून सुरुवात होणार आहे. परीक्षेसंदर्भातील सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. तरी विद्यार्थी व महाविद्यालयांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे. शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या हिवाळी परीक्षांना २० ऑक्टोबरपासून सुरुवात होणार आहे. पारंपारिक अभ्यासक्रमाच्या पदवी प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षा व परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा यथावकाश जाहीर केल्या जाणार आहेत. महाविद्यालय व अधिविभागांनी वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करावयाचे आहेत. सीएस किंवा महाराष्ट्र शासनाच्या वतीने अभियांत्रिकी, आर्किटेक्चर व औषधनिर्माणशास्त्र व इतर अभ्यासक्रमाची एमएचटी-सीईटी सामाईक प्रवेश परीक्षा असेल त्या दिवशी संगणकाशी संबंधीत परीक्षा व विद्यापीठाच्या सुट्टीच्या दिवशी कोणतीही प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा होणार नाही. तरी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परीक्षांचे वेळापत्रक उपलब्ध आहे.